प्रसिद्धी : दरमहा १५ तारखेस    दि यशवंत बँक फलटणचे मुखपत्र    RNI No. MAHMAR/2010/31891

# यशवंत इन हाऊस

YASHWANT IN HOUSE

• फलटण जि. सातारा. • वर्ष १२ वे • अंकः ८ वा • नोव्हेंबर २०२२ • पृष्ठ १६

## राष्ट्रीय सहकार सप्ताह

**१४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर**

## सहकाराची सात मूलतत्वे




अंतरंग

| १) मुखपृष्ठ | २) मनाचे श्लोक | ३/४) दिनविशेष | ५) बँकींग ज्ञान | ६) विशेष ज्ञान | ७/८) सामान्य ज्ञान | ९) कविता | १०) वार्षिक सभा
| ११) सहकार संवाद | १२) वर्धापनदिन | १३) नविन ठेव योजना | १४/१५) कर्ज योजना | १६) गृह/वाहन कर्ज योजना



समर्थ रामदास स्वामी रचित

# ॥मनाचे श्लोक॥

समर्थांच्या मते माणसाने दुसऱ्याला उपदेश करण्यापेक्षा स्वतः सुधारावे, स्वतःमध्ये बदल घडवून आणावा आणि इतरांना मदत करावी. जीवन आनंदाने कसे जगावे आणि सर्वांशी प्रेमाने कसे वागावे याची कला शिकविणारा ग्रंथ म्हणजे मनाचे श्लोक होय. समर्थ रामदास रचित

"मनाचे श्लोक" अर्थासहित मालिका - भाग २२

*जय जय रघुवीर समर्थ ।*

श्लोक क्र. १११

हिताकारणें बोलणें सत्य आहे ।
हिताकारणें सर्व शोधूनि पाहें ।
हिताकारणें बंड पाषांड वारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥

हितासाठी खरे बोलणे गरजेचे असते. आपल्या कल्याणासाठी शास्त्र ग्रंथाचा शोध घे आपल्या हितासाठी भगवंताचा द्रोह करणे व दांभिकपणे वागणे या गोष्टी तू सोडून दे. ज्यामुळे वाद-विवाद संपतात, ते संभाषण हितकारक असते.

श्लोक क्र. ११२

जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला ।
परी वाद वेवाद तैसा चि ठेला ।
उठे संशयो वाद हा दंभधारी ।
तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥

तात्त्विक उपदेश करणारे जन्मभर सांगत राहिले आणि ऐकणारे ते ऐकत राहिले. परंतु वाद-विवाद आहेत तसेच राहिले. दुर्जन माणसांच्या मनात नेहमी संशय येतो. त्यामुळे त्याचा दंभ वाढत राहतो. ज्या बोलण्यामुळे वाद संपतात, ते बोलणे हितकारक होय.

श्लोक क्र. ११३

जनीं हीत पंडीत सांडीत गेले ।
अहंतागुणें ब्रह्मराक्षेस झाले ।
तयाहूंनि वित्पन्न तो कोण आहे ।
मना सर्व जाणीव सांडूनि राहे ॥

मोठमोठे विद्वान अहंकारामुळे आत्मकल्याण साधू शकले नाहीत. त्यांच्यापेक्षा विद्वान कोण होते ? परंतु अहंकारामुळे ते शेवटी ब्रह्मराक्षस झाले. म्हणून हे मना, विद्वत्तेची घमेंड सोडून दे.

श्लोक क्र. ११४

फुकाचें मुखीं बोलतां काय वेचे ।
दिसेंदीस अभ्यांतरी गर्व सांचे ।
क्रियेवीण वाचाळता वेर्थ आहे ।
विचारें तुझा तूंचि शोधून पाहें ॥

फुकटची बडबड करण्यास काहीही लागत नाही. उलट त्यामुळे मनामध्ये दिवसेंदिवस घमेंड वाढू लागते. आचरणाशिवाय बडबड करणे व्यर्थ होय. हे खरे की खोटे, ते तूच शोधून बघ.

श्लोक क्र. ११५

तुटे वाद संवाद तेथें करावा ।
विवेकें अहंभाव हा पालटावा ।
जनीं बोलण्यासारखें आचरावें ।
क्रियापालटें भक्तिपंथें चि जावें ॥

जेथे वाद-विवाद संपण्याची शक्यता असेल, तेथेच संभाषण करावे. विवेकाने अहंकार नाहीसा करण्याचा प्रयास करावा. बोलल्याप्रमाणे वागावे. भक्तीचा मार्ग मनुष्याचे आचरण बदलून टाकतो. म्हणून त्या मार्गाने जावे.

# ९ नोव्हेंबर - राष्ट्रीय आयुर्वेद दिन

धनत्रयोदशीचे दीपावलीत एक वेगळे महत्त्व आहे. कारण, याच दिवशी धन्वंतरी जयंती असते. धन्वंतरी म्हणजे वैद्यांचा देव, एवढेच सर्वांना माहीत असते. पण, त्याहून अधिक माहिती आजच्या लेखातून करुन घेऊया...

सण म्हणजे आनंदाचे क्षण. भारतामध्ये विविध प्रांतांनुसार वेगवेगळे सण साजरे केले जातात. काही मोजकेच सण संपूर्ण भारतात एकत्र साजरे होतात, त्यातील महत्त्वाचा एक सण म्हणजे दिवाळी. दिवाळी ही गोवत्स द्वादशी म्हणजेच वसुबारसेपासून सुरू होते आणि भाऊबीजेला संपते. दिवाळी म्हणजेच सणांची राणी. दिवाळीसाठी सर्वच उत्साही असतात. वातावरणातही आनंद, उत्साह आणि जल्लोष असतो. आसमंतात ही नवनिर्मितीची चाहूल दिसू लागते. नवचैतन्य, सकारात्मकतेच्या ऊर्जेची जणू बरसातच दिवाळीत होते. दिवाळीच्या प्रत्येक दिवसाला महत्त्व आहे. गोपूजन, लक्ष्मीपूजन ते बंधू-भगिनीचं नाते जोपासणे इ. सर्व गोष्टी या सहा दिवसांच्या आनंदोत्सवात साजऱ्या केल्या जातात. प्राचीन भारतात अनेकविध विद्याशाखा उत्तमरित्या प्रगत होत्या. त्यातीलच आयुर्वेद हे वैद्यकशास्त्र. जसे हल्ली सर्व गोष्टींचे पुरावे द्यावे लागतात, संशोधन करावे लागते आणि तेव्हाच ते मान्य केले जाते. तसेच प्राचीन काळी एखादी गोष्ट धर्माशी किंवा व्रत-वैकल्याशी जोडली गेली, तर सामान्यांपर्यंत ती रुजविणे सोपे होई. म्हणूनच विविध सणां'धील पदार्थ हे त्या-त्या ऋतूला गरजेचे असतात. उदा. संक्रांतीतील तीळगूळ, गुढीपाडव्यावेळी कडुनिंबाचे पान खाणे, रामनवमीचा सुंठवडा इ. याचप्रमाणे धन्वंतरीबद्दलचेही वैशिष्ट्य आहे. चार वेदांमधील अथर्ववेदाचा उपांग म्हणजे आयुर्वेद. अथर्ववेदात एकूण सहा हजार ९७७ सूत्र आहेत, जी ७३१ सुक्तांमध्ये विभागलेली आहेत. आयुर्वेदाची उत्पत्ती 'ब्रह्मस्मृति' म्हणजेच ब्रह्माचे पुनःस्मरण (माहीत नसलेल्याचेच स्मरण होते) केले. याचा अर्थ आयुर्वेदकालातीत आहे. वेदांमधून प्राचीन वैद्यकशास्त्राचे काही पुरावे सापडतात. उदा.ऋग्वेदात असे उल्लेख सापडतात की, ज्यात राणी विषपाला हिला कृत्रिम पाय प्रत्यारोपित केला. अश्विनी कुमार, ज्यांना देवतांचे वैद्य मानले जाते, त्यांनी वेळोवेळी अनेकांचे अंधत्व व कुब्जत्व दूर केले. याचे उल्लेख ऋग्वेदात सापडतात. असा कालातीत आयुर्वेदही केवळ औषधोपचार पद्धती नसून स्वस्थ आणि दीर्घायुष्यासाठीचे शास्त्र आहे. आयुर्वेदाचे प्रयोजनसुद्धा असेच आहे. 'स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणं, आतुरस्य विकार प्रशमनं च । 'म्हणजेच, स्वस्थ व्यक्तीच्या स्वास्थ्याचे रक्षण हे पहिले कर्तव्य आहे, मनुष्य आजारी पडू नये (preventive medicine) यासाठीचे विविध उपाय आणि योग्य जीवनपद्धती सांगितली आहे. यानंतरचे प्रयोजन म्हणजे आतुर (आजारी) व्यक्तीचे आजार/विकारांचे प्रशमन करणे, ते दूर करणे. आयुर्वेद पृथ्वीवर कसा आला, कसा आणला गेला, याबद्दल 'आयुर्वेदावतरण' यात सांगितले आहे. भागवत पुराणात विष्णूचा अवतार म्हणून धन्वंतरीचा उल्लेख आहे. समुद्रमंथनाच्या वेळेस मेरू (मंदार) पर्वताचे वासुकीची रवी करून मंथन केले तेव्हा १४ रत्न बाहेर पडली. त्यात अमंतकलश घेऊन भगवान धन्वंतरी प्रगटले.

ॐ शंखं चक्रं जलौकां दधदमृतघटं चारुदोर्भिश्चतुर्मिः।
सूक्ष्मस्वच्छातिहृद्यांशुक परिविलसन्मौलिमंभोजनेत्रम।।
कालाम्भोदोज्ज्वलांगं कटितटविलसच्चारूपीतांबराढ्य'।
वन्दे धन्वंतरिं तं निखिलगदवनप्रौढदावाग्निलीलम।।

या प्रार्थनेमध्ये धन्वंतरीचे वर्णन आहे. मागील दोन हातांमध्ये शंख व चक्र आणि पुढील दोन हातांमध्ये जलौका (जळू) आणि अमृतकलश आहे. पीतांबर नेसून जगकल्याणासाठी, सर्वांना आजारांपासून मुक्त करण्यासाठी पृथ्वीतलावर अवतरले. धन्वंतरीचे प्रगटीकरण समुद्रातून (जलीय तत्त्वातून) झाल्यामुळे त्यांना 'अब्ज देवता' ही म्हटले जाते. ब्रह्माने एक लक्ष श्लोकांमध्ये आयुर्वेदाचे स्मरण केले. त्यांनी दक्ष

प्रजापतिला तो शिकवला. पुढे अश्विनी कुमार, इंद्र आणि धन्वंतरी यांनी त्याचे ग्रहण केले. धन्वंतरींनी आयुर्वेदाचे वर्गीकरण आठ विभागांत केले (म्हणून 'अष्टांग आयुर्वेद')त्यामुळे ते अध्ययनास सोपे झाले. प्राचीन काळातील ऋषी बुद्धीने तल्लख आणि निष्णात होते. त्यांनी सर्वप्रथम आंतरराष्ट्रीय संमेलन हिमालयाच्या पायथ्यापाशी भरवले. यात आत्रेयऋषी, काश्यपऋषी, धन्वंतरी, दिवोदास इ. होते. आत्रेयांनी कायचिकित्सा (Medicine) काश्यपांनी स्त्रीरोग आणि बालरोग व धन्वंतरींनी शल्यचिकित्सा (Surgery) यात नैपुण्य प्राप्त केले. धन्वंतरीकडून दिवोदासांनी नंतर त्यांच्याकडून सुश्रुतांनी व अन्य सात शिष्यांनी हे ज्ञान आत्मगत केले. आत्रेय ऋषींनी त्यांच्या सहा शिष्यांना आयुर्वेद शिकविला. ही गुरू-शिष्य परंपरा पुढे चालू राहिली. आजही सुश्रुत संहिता व चरक संहिता यांचा आयुर्वेदस्नातक अभ्यासतात यांचा बृहत त्रयीमध्ये (तीन महत्त्वाच्या संहिता) समावेश होतो.

जसजसे युग बदलत गेले, तसतसे आध्यात्मिक अंगाचा दृष्टिकोन बदलून शास्त्रीय दृष्टिकोन येऊ लागला. कलियुगात हल्लीच्या काळात शास्त्रीय आधारावर आयुर्वेद आजही सिद्ध करता येतो. हळदीचा रक्तस्त्राव थांबविणे हा गुण आजही बघायला मिळतो. जळवांचा अशुद्ध रक्त काढणे, जेथे अवरोध (block) आहे तो काढणे यासाठी आजही उपयोग होतो. विविध भस्मांचा औषधी कल्पांमधील वापर Nano Technology ने आज ही सिद्ध करता येतो. भारताने जगाला तत्त्वज्ञान दिलेच आहे. त्याचबरोबर 'योग' आणि 'आयुर्वेद' ही दोन शास्त्रेही भारतानेच जगासमोर आणली आहेत. जसे २१ जून हा 'जागतिक योग दिन' म्हणून साजरा केला जातो, त्याच धर्तीवर 'आयुष' (Ministry of - ayush) द्वारा धनत्रयोदशीला म्हणजे धन्वंतरी जयंतीच्या दिवशी 'राष्ट्रीय आयुर्वेद दिवस' सन २०१६ पासून साजरा केला जातो. जनसामन्यांसाठी आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार व्हावा, या हेतूने दरवर्षी एक संकल्पना ठरवली जाते. "Ayurveda In public Health' या पद्धतीने आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार केल्याने, शारीरिक, मानसिक स्वास्थ्य उत्तम ठेवणे शक्य होईल. तुम्हा सर्वांना सुख-समृद्धी आणि आरोग्य लाभो, ही धन्वंतरीचरणी प्रार्थना...

★ ★ ★

## माहे नोव्हेंबर दिनविशेष

५ नोव्हेंबर :- मराठी रंगभूमी दिन

९ नोव्हेंबर :- धन्वंतरी दिन

१० नोहेंबर :- जागतिक विज्ञान दिन

११ नोव्हेंबर :- राष्ट्रीय शिक्षण दिन

१४ नोव्हेंबर :- राष्ट्रीय बालदिन (पं.नेहरू यांचा जन्मदिन)

# चेक बाऊन्स

## आता चेक बाऊन्सच्या प्रकरणांना बसेल चाप !

चेक बाऊन्सची प्रकरणे प्रभावीपणे हाताळण्यासाठी केंद्र सरकार लवकरच एक नवीन नियम आणण्याच्या तयारीत आहे. इंडस्ट्री बॉडी पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीने अलीकडेच वित्त मंत्रालयाला विनंती केली होती की. चेक बाऊन्स झाल्यास काही दिवसांसाठी बँकेतून पैसे काढण्यावर बंधनकारक स्थगिती सारखी पावले उचलावीत. जेणेकरून चेक जारी करणाऱ्यांना जबाबदार धरता येईल. त्यानुसार संबंधितांकडून याविषयी सूचना मागविण्यात आल्या होत्या. यासंबंधी विविध सूचना प्राप्त झाल्या असून त्यावर आता विचार सुरू आहे. त्यातील योग्य सूचना स्वीकारून लवकरच नवी नियमावली करण्यात येणार आहे.

चेक बाऊन्स प्रकरणी कितीही नियम आणि कायदे केले तरी हे प्रकार कमी होत नाही. उलट यंत्रणांवर त्याचा ताणच येत आहे. त्यामुळे या नियमांत आणखी काही सुधारणा करण्याचा विचार सरकार करीत आहेत. हा नवा नियम अर्थ मंत्रालयाने लागू केल्यास चेक जारी करणाऱ्याच्या दुसऱ्या खात्यातून पैसे कापले जातील. यासोबतच नवीन खाती उघडण्यावरही बंदी घातली जाऊ शकते. अर्थ मंत्रालय अशा अनेक पावलांवर विचार करत आहे. चेक बाऊन्सची वाढती प्रकरणे पाहता मंत्रालयाने नुकतीच एक उच्चस्तरीय बैठक बोलावली होती. ज्यामध्ये अशा अनेक सूचना प्राप्त झाल्या आहेत.

### असा असणार नियम

चेक जारी करणाऱ्याच्या खात्यात पुरेसे पैसे नसल्यास त्याच्या इतर खात्यांमधून रक्कम कापली जाईल. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार इतर सूचनांमध्ये चेक बाऊन्सचे प्रकरण कर्ज डिफॉल्ट म्हणून हाताळणे आणि क्रेडिट माहिती कंपन्यांना कळवणे समाविष्ट आहे जेणेकरून व्यक्तीचे गुण कमी करता येतील.

या सूचना स्वीकारण्यापूर्वी कायदेशीर मत घेतले जाणार आहे.

चेक बाऊन्स झाल्यास काही दिवसांसाठी बँकेतून पैसे काढण्यावर बंधन आणणे, चेक जारी करणाऱ्याच्या खात्यात पुरेसे पैसे नसल्यास त्याच्या इतर खात्यातून रक्कम वजा करणे, संबंधिताला नवीन खाती उघडण्यावरही बंदी घालणे, चेक बाऊन्सची प्रकरणं कर्ज डिफॉल्ट म्हणून हाताळणे, चेक जारी करणाऱ्याचा क्रेडिट स्कोअर कमी करणे अशा अनेक सूचना आल्या आहेत.

### नवीन नियमामुळे हे फायदे होणार

वित्त मंत्रालयाकडून प्राप्त झालेल्या या सूचनांची अंमलबजावणी झाल्यास पैसे देणाऱ्याला चेक भरण्यास भाग पाडले जाईल. त्यामुळे हे प्रकरण न्यायालयात नेण्याची गरज भासणार नाही. यामुळे व्यवसाय करण्याची सुलभता वाढेल आणि खात्यात पुरेसे पैसे नसतानाही धनादेश देण्याची प्रथा बंद होईल.

★ ★ ★



विशेष ज्ञान

# Concept of a 'Bad Bank'

मोदी सरकारने 'बॅड बँक' स्थापन करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. मागील ३१ मार्चपर्यंत, ५०३३५ कोटी रुपयांची १५ प्रकरणे हस्तांतरित करून या 'बॅड बँक' चे कामकाज सुरू झाले आहे.

जेव्हा बँकेला तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी एखाद्या विशिष्ट कर्जासाठी मुद्दल आणि व्याज मिळणे थांबते, तेव्हा ते कर्ज NPA मानले जाते.

कर्ज एकदा NPA झाले की पूर्वीच्या सरकारच्या काळात काही तरी करून ते माफ (waive-off) होत असे.

आता तसं होत नाही. आता ते बँकांच्या बॅलन्स-शीट वरून काढण्यात येते, अर्थात write-off होते आणि केवळ वसुलीसाठीच बनवण्यात आलेल्या कंपनीला देण्यात येते आणि रक्कम माफ न करता त्याची वसुली होते.

बॅलन्स-शीट मधून हे कर्ज कमी केल्याने बँक आपलं काम त्यापुढे नीट करू शकते, अन्यथा त्या थकबाकीच्या आकडेवारी मुळे बँकेकडून इतरांना कर्ज देण्याच्या आणि त्यांच्याकडे येणाऱ्या ठेवींवर दोन्हीवर परिणाम होतो.

यात काही रॉकेट-सायन्स नाही. आपण बँकेत पैसे ठेवतो, बँक आपल्याला व्याज देते. आपण बँकेकडून कर्ज घेतलं, तर आपण बँकेला व्याज देतो. जर येणारे व्याज कमी झाले किंवा बंद झाले, तरी बँकेला ठेवीदारांना तर व्याज द्यावं लागणारच आहे. मग बँक आपल्या ठेवींवर कमी व्याज देणार. ते व्याज देता यावं यासाठी दिलेल्या कर्जावर जास्त व्याज घेणार.

ज्या बँकेत कमी व्याज मिळत असेल त्या बँकेत पैसे कोण ठेवणार? आणि, इतरांपेक्षा जास्त व्याज लागत असेल तर त्या बँकेतून कर्ज तरी कोण घेईल? परिणामी, ती बँक बुडणार. अर्थात, सगळं गणितच दिलेल्या कर्जाच्या वसुली वर अवलंबून आहे..

'वसुली' वरून सरकारला एक गोष्ट समजली आहे. कर्जदार कर्ज फेडू शकत नाहीत हे ९०% केसेस मध्ये खोटं असतं. सत्य हे आहे की ते जाणूनबुजून आणि पूर्वीच्या सरकारांनी लावलेल्या घाणेरड्या 'ले दे के खतम करो' सिन्ड्रोम मुळे फेडत नसतात ! पूर्वी हे पचत होतं. आता तसं होत नाही.

आता त्यांचे कर्जच विकत घेतले जाणार आहे. प्रॉफिटमध्ये असूनही बुक्स मध्ये लॉस दाखवणाऱ्या या कंपन्यांचे योग्य व्हॅल्यूएशन करून त्या कंपन्या आणि त्यांची मालमत्ता, त्यांनी घेतलेल्या कर्जासाहित विकत घेतल्या जाणार. विकत घेणारी नवीन कंपनी ते कर्ज मग फेडणार. 'ले दे के खतम करो' चे 'लेने के देने' झालेलं आहे.

सरकार कडून दोन कंपन्या बनवण्यात आल्या आहेत. 'नॅशनल ऍसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड' (NARCL) आणि 'इंडिया डेट रिझोल्यूशन कंपनी लिमिटेड' (IDRCL).

NARCL ही कंपनी बँकांकडून NP- खाती मिळवून एकत्रित करेल तर IDRCL एका विशेष व्यवस्थेअंतर्गत कर्ज निराकरण प्रक्रिया हाताळेल. 'कर्ज निराकरण' वगैरे शुगर-कोटिंग केलेले शब्द इग्नोर करा, सोप्या भाषेत सर्व मार्गाने वसुली करेल.

NARCL प्रथम बँकांकडून बुडीत कर्जे खरेदी करेल आणि ठरलेल्या किमंतीच्या १५% रोख रक्कम त्या बँकेला तात्काळ देईल. उरलेली ८५% थकबाकीदारांची मालमत्ता/कंपनी विकून IDRCL बँकांना देईल. वसुली होईपर्यंत बँकांना देण्यासाठी सरकारने ३०६०० कोटी रुपये बॅड बँकेकडे वेगळे ठेवले आहे.

बॅड बँक बनवायची घोषणा होताच थकबाकीदारांची तंतरली आहे. थकबाकीच्या रक्कमेची वसुलीही होणार हे स्पष्ट झाले, आणि जिकडे २ लाख कोटींचे ऍसेट्स या बॅड बँक कडे हस्तांतरित होणार होते.. त्यातील १४९६६५ कोटी रुपयांची प्रकरणे ती हस्तांतरण होण्याआधीच थकबाकीदारांनी सेटल करून घेतली! यावरूनच लक्षात येतं की हा निर्णय किती योग्य आहे. असे टॅक्स-पेयर्स आणि ठेवीदारांचे लाखो कोटी रुपये थकवणाऱ्या लोकांकडून वसुली करून, ती रक्कम सरकार पुन्हा बँकेला देणार. 'बॅड बँक' हा एक कन्सेप्ट आहे. NARCL + IDRCL = बॅड बँक.

★ ★ ★

# विश्व कल्याण प्रार्थना - पसायदान

पसायदान मध्ये ९ ओव्या आहेत.या ९ ओव्यांचा अर्थ आपण समजून घेवू.

आता विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावे, पसायदान हे ।।१।।

अर्थ – माऊली म्हणतात, या विश्वात्मक विश्वाच्या कणा कणामध्ये भरून राहिलेल्या माझ्या भगवंता. माझ्या वाणीचा यज्ञ तुझ्या कृपेमुळे अखंड चालू आहे. या यज्ञाला आपण प्रसन्न व्हावे आणि मला हे प्रसादाचे या पसायदानाचे दान द्यावे.

जे खळांची व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रती वाढो ।
भूता परस्परे जडो, मैत्र जीवांचे ।।२।।

अर्थ – माऊली ईश्वराकडे मागतात, हे ईश्वरा एक माझे मागणे आहे, या जगामध्ये जे काही वाईट प्रवृत्तीचे लोक आहेत त्यांच्या त्या वाईट प्रवृत्तीचा नाश कर. कारण कुठलाही मनुष्य हा कधीच वाईट नसतो. त्याचे गुण वाईट असू शकतात. फक्त तेच काढून टाक. दुष्प्रवृत्ती काढून टाकल्यावर त्यांच्या सत्कर्मामध्ये वाढ कर. हे जर केले तर नक्कीच या पृथ्वीवरील सर्व जीव प्रेमळ होऊन जातील.




भगवंताकडे मागणे मागताना माऊलींना आपल्या वाईट म्हणवल्या जाणाऱ्या मुलांची जास्त काळजी वाटते. कारण प्रत्येक मनुष्य सत्प्रवृत्ती मधून दैवत्वकडे वाटचाल सुरू करू शकतो हा त्यांना विश्वास आहे.

दुरितांचे तिमीर जावो, विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो प्राणिजात ।।३।।

अर्थ – जगामध्ये पाप हे फक्त अज्ञानरूपी अंधारामुळे आहे. हा अंधार नाहीसा होण्यासाठी जगात स्वधर्मी रुपी सूर्याचा उदय होवो. प्राणिमात्रांच्या मंगल इच्छा पूर्ण होवोत.
इथे स्वधर्म म्हणजे हिंदू, मुस्लिम, सिख, बौद्ध इत्यादी धर्म नव्हे तर माणुसकी हा धर्म प्रतीत आहे. हा धर्म जर आचरणात आणला तर प्राणिमात्रास इच्छे प्रमाणे सर्वकाही मिळेल.

वर्षत सकळमंगळी, ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी, भेटतु भूतां ।।४।।

अर्थ – या विश्वामध्ये ईश्वरनिष्ठ लोकांची सदैव उत्पत्ती होत राहो. सध्या नश्वर गोष्टींवर प्रेम असणारी प्रवृत्ती वाढत आहे. धनसंपत्तीलाच सुख मानणारे लोक नकोत तर आत्म्यास चिरंतन सुख मागणारे लोक जन्मास यावे असे माऊली मागतात.

चला कल्पतरूंचे आरव, चेतनाचिंतामणींचे गांव ।
बोलते जे अर्णव, पीयूषाचे ।।५।।

अर्थ – ईश्वरनिष्ठ लोक म्हणजे संत. संत हे कल्पतरूंचे उद्यान आहे. संत जेथे राहतात ते जणू चिंतामणींचे गावच आहे. त्यांची वाणी जणू अमृताचे समुद्र आहे. जर ईश्वरनिष्ठ लोकांशी संग ठेवला तर आपल्याला काहीच कमी पडणार नाही असा या ओवीचा मतितार्थ आहे.

चंद्रमे जे अलांछन, मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन, सोयरे होतु ।।६।।

अर्थ – जो मनुष्य चारित्र्यावर कोणताही डाग नसलेला चंद्रच आहे. अंधारामध्ये सुद्धा दुसऱ्याला साथ देणारा आहे. रागीट स्वभाव नसणारा ज्ञानरूपी प्रकाशाचा सूर्यच आहे. अश्या व्यक्तीला सदैव सज्जन लोकांची साथ लाभते व त्याचे सोयरे ही अगदी त्यांच्या सारखेच असतात.

किंबहुना सर्वसुखी, पूर्ण होऊनि तिहींलोकीं।
भजि जो आदिपुरुखी, अखंडित ॥७॥

अर्थ – विश्वामध्ये तिन्ही लोकांतील लोक सर्व सुखी होऊन अखंड या आदि पुरुषाची भक्ती करत राहोत. तसे पाहता सर्व सुख मिळाल्यानंतर भगवंताकडे जाण्याची लोकांची इच्छा कमी होत जाते आणि तसे न होण्याची मागणी माऊली इथे करत आहे.

आणि ग्रंथोपजीविये, विशेषी लोकी इये ।
दृष्टादृष्ट विजये, होआवे जी ॥८॥

अर्थ – आद्य भगवंताने जे वेद आणि ग्रंथांची निर्मिती केली आहे.या ग्रंथांचा अभ्यास हेच लोकांच्या जीवनाचे लक्ष्य व्हावे.त्याच ग्रंथामध्ये दिलेल्या मार्गदर्शनानुसार आयुष्य व्यतीत करावे. ग्रंथाना गुरु माना आणि आपले जीवन सुखकर करा.

येथ म्हणे श्रीविश्वेशरावो, हा होईल दानपसावो ।
येणे वरे ज्ञानदेवो सुखिया झाला ॥९॥

अर्थ – हे विश्वेश्वरा , हे जगाच्या मायबापा तू जेव्हा म्हणशील ना, की हे दान मी तुला दिले तेव्हाच हा ज्ञानदेव चिरंतन सुखी होईल.

तर मित्रांनो असा आहे या विश्वप्रार्थनेचा मराठी संपूर्ण अर्थ. ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरी ग्रंथातील नऊ हजार ओव्यांचे हे सार आहे.
एका आदर्श समाज व्यवस्थेचे स्वप्न या जगत माऊलीने आठशे वर्षापूर्वी पहिले होते. ज्ञानेश्वरांनी आपल्या सगळ्यांच्या कल्याणासाठी मागितलेली हि प्रार्थना खरोखरच खूप सुंदर आहे.

★★★

# सकारात्मक आणि नकारात्मक विचार

एकदा दोन मैत्रिणींची मुलं झाडावर चढली होती, मुलं झाडावर उंच पोहचल्यावर अचानक जोराचं वादळ आलं. ते झाड वाऱ्यानं गदागदा हालू लागलं.

पहिल्या मुलाची आई तिच्या मुलाला म्हणाली, पडशील.
तर दुसऱ्या मुलाची आई म्हणाली, सांभाळ, घट्ट पकडून ठेव.
खरंतर दोन्ही मैत्रिणींना आपापल्या मुलांना पडण्यापासून वाचवायचं होतं. परंतु त्यांच्या मुखातून निघालेल्या संदेशांमध्ये मात्र विरोधाभास होता.

परिणामी पहिल्या स्त्रीचा मुलगा फांदीवरुन घसरून खाली पडला. मात्र दुसऱ्या स्त्रीच्या मुलानं फांदी घट्ट धरून ठेवली आणि तो अलगद उतरून खाली आला.

काय बरं असेल या मागचं कारण?

पहिल्या स्त्रीच्या शब्दामध्ये नकारात्मकता होती. जी तिच्या मुलानं ग्रहण केली आणि तो पडला.

या उलट दुसऱ्या स्त्रीनं उच्चारलेल्या शब्दांमध्ये सकारात्मकता असल्याने तिच्या मुलानं ती ग्रहण केली आणि तो फांदीवर आपले पाय घट्ट रोवून बसला होता.

म्हणून, नेहमी सकारात्मक बोला. सकारात्मक कल्पनाचित्रे निर्माण करा. म्हणजेच सकारात्मक बदल घडून येईल.

आपल्या प्रार्थनेवर आणि आदेशांवर नेहमी पूर्ण विश्वास असायला हवा. योग्य आदेश देण्याची कला आत्मसात करा. Think Positive, Be Positive

★★★

कविता

# कागदाचं एक पान असतं

कसं आहे ना?

कागदाचं एक
पान असतं...!!

'श्री' लिहलं, की
पूजलं जातं ...

प्रेमाचे चार शब्द
लिहले, की
जपलं जातं...

काही चुकीचं
आढळलं, की
फाडलं जातं...

कागदाचं एक
पान असतं...!!

कधी त्याला
विमान बनवून
भिरकावलं जातं...

कधी होडी बनवून
पाण्यात सोडलं जातं...

कधी भिरभिरं बनवून
वाऱ्यावर फिरवलं जातं...

आणि कधी तर
निरुपयोगी म्हणून
चुरगाळलंही जातं...

कागदाचं एक
पान असतं....!!

जे लेखकाच्या
लेखणीला हात देतं...

जे चित्रकाराच्या
चित्राला साथ देतं...

जे व्यापाऱ्याच्या
हिशोबाला ज्ञात ठेवतं...

आणि हो,
वकीलासोबत कोर्टात गेलं,
की साक्षही देतं...

कागदाचं एक
पान असतं.....!!

पेपरवेट ठेवलं, की
एकदम गप्प बसतं...

काढून घेतलं, की
स्वच्छंदी फिरतं आणि
कशांत अडकलं, तर
फडफडायला लागतं...

कागदाचं एक
पान असतं.....!!

ज्यावर बातम्या छापल्या,
की वर्तमानपत्र बनतं...

प्रश्न छापले, की
प्रश्नपत्रिका बनतं...

विवाहाचं निमंत्रण छापलं,
की लग्नपत्रिका बनतं...

तर कधी आदेशसंदेश
लिहले, की तेच टपालही
बनतं...

कागदाचं एक
पान असतं....!!

माणसाच्या जीवनांत
आणि त्यांत खूप
साम्य असतं...!!

कागदाचं एक पान असतं...!!
जन्मला आला तर birth
certificate असतं
निधन झाला तर Death
certificate असतं

कागदाचं एक पान असतं

★ ★ ★



# ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

## ऐक्य

### सभासदांच्या विश्वासामुळे दि यशवंत को-ऑपरेटिव्ह बँकेची प्रगती : शेखर चरेगावकर



मार्गदर्शन करताना शेखर चरेगावकर, शेजारी पदाधिकारी व अधिकारी.

कराड, दि.१० : सभासदांच्या विश्वासामुळे दि यशवंत को-ऑप बँकेची प्रगती झाल्याचे प्रतिपादन बँकेचे अध्यक्ष शेखर चरेगावकर यांनी केले.

दि यशवंत को-ऑपरेटिव्ह बँकेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा प. पू. उपळेकर महाराज समाधी मंदिर सभागृहात झाली. त्यावेळी ते बोलत होते.

ते म्हणाले, कोरोना संपला असला तरी कोरोना कालावधीत उद्योग व्यवसायांचे झालेले नुकसान भरून काढण्याकरिता अजून २ ते ३ वर्षांचा कालावधी लागेल. व्यवसाय, शेती, उद्योग सुरू झाले असले तरी मागील ३ वर्षात जे नुकसान झाले आहे ते भरून काढण्यासाठी बँकांनी कर्जदारांच्या मागे उभे राहून त्यांना सहकार्य केले पाहिजे. त्यासाठी बँकेने या आर्थिक वर्षाअखेर १६० कोटी ३५ लाख रुपयांचे कर्ज वाटप करून उद्योग, व्यवसाय, शेती यास उभारणी देण्याचे काम केले आहे. उद्योग, व्यवसाय, शेती यासमोर असलेल्या समस्यांमुळे सध्या बँकांची नफाक्षमता कमी होत आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सभासदांनी लाभांशाचा आग्रह न धरता बँकेच्या निधी सक्षमीकरणासाठी सहकार्य केले पाहिजे.

सध्या आर्थिक क्षेत्र पूर्वपदावर येण्यासाठी काही विलंब लागत असला तरी दि यशवंत बँकेची झालेली वसूल भागभांडवलाची वाढ ५५ लाख ६२ हजार, ठेवीमध्ये झालेली वाढ ११ कोटी ५६ लाख, कर्जामध्ये झालेली वाढ १६ कोटी १२ लाख, नफ्यामध्ये झालेली वाढ ४५ लाख ६५ हजार अशी वाढ करत बँकेने ३५० कोटींचा एकत्रित व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला आहे. लेखा परीक्षणात सातत्याने १२ वर्षे मिळालेला 'अ वर्ग' हे केवळ सभासदांनी बँकेच्या व्यवस्थापनावर दाखविलेल्या विश्वासामुळे शक्य झाले आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी बँकेच्या बिनविरोध निवडून आलेल्या सर्व संचालक मंडळाचे स्वागत व परिचय करून देण्यात आला. यावेळी अध्यक्ष शेखर चरेगावकर, उपाध्यक्ष अजित निकम, संचालक नानासाहेब पवार, प्रा.श्रीकृष्ण जोशी, गोपीनाथ कुलकर्णी, संदीप इंगळे, जयवंत जगदाळे, महेशकुमार जाधव, डॉ.प्रदीप शिंदे, डॉ. सचिन साळुंखे, सुहास हिरेमठ, परशराम जंगाणी, सौ. कल्पना गुणे, सीए. प्रियेश खिरड उपस्थित होते. विषयपत्रिकेवरील विषयांचे वाचन बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वैशाली मोकाशी यांनी केले व सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. बँकेचे उपाध्यक्ष अजित निकम यांनी आभार मानले.

## सभासदांच्या विश्वासामुळे यशवंत बँकेची प्रगती – शेखर चरेगांवकर



**कराड (लक्ष्मीपुत्र) - कोरोना संपला असला तरी कोरोना कालावधीत उद्योग व्यवसायांचे झालेले नुकसान भरुन काढण्याकरीता अजून २ ते ३ वर्षाचा कालावधी लागेल. व्यवसाय, शेती, उद्योग सुरु झाले असले तरी मागील ३ वर्षात जे नुकसान झाले आहे, ते भरून काढण्यासाठी बँकांनी कर्जदारांच्या मागे उभे राहून त्यांना सहकार्य केले पाहिजे. त्यासाठी बँकेने या आर्थिक वर्षाअखेर १६० कोटी ३५ लाख रुपयांचे कर्ज वाटप करून उद्योग, व्यवसाय, शेती यास उभारणी देण्याचे काम केले असल्याचे बँकेचे अध्यक्ष शेखर चरेगांवकर यांनी सांगितले.**

दि यशवंत को-ऑप.बँकेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा प.पु.उपळेकर महाराज समाधी मंदिर, फलटण या सभागृहात संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.

अध्यक्ष शेखर चरेगांवकर म्हणाले, उद्योग, व्यवसाय, शेती यासमोर असलेल्या समस्यांमुळे सध्या बँकांची नफा क्षमता कमी होत आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सभासदांनी डिव्हीडंडचा आग्रह न धरता बँकेच्या निधी सक्षमीकरणासाठी सहकार्य केले पाहिजे असेही त्यांनी म्हंटले. सध्या आर्थिक क्षेत्र पूर्वपदावर येण्यासाठी काही विलंब लागत असला तरी दि यशवंत बँकेची झालेली वसुल भागभांडवलाची वाढ ५५ लाख ६२ हजार, ठेवीमध्ये झालेली वाढ ११ कोटी ५६ लाख, कर्जामध्ये झालेली वाढ १६ कोटी १२ लाख, नफ्यामध्ये झालेली वाढ ४५ लाख ६५ हजार अशी वाढ करत बँकेने ३५० कोटीचा एकत्रित व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला आहे. लेखापरीक्षणात सातत्याने १२ वर्षे मिळालेला अ वर्ग हे केवळ सभासदांनी बँकेच्या व्यवस्थापनावर दाखविलेल्या विश्वासामुळे शक्य झाले आहे.

बँकेच्या नुकत्याच पार पडलेल्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक बिनविरोध निवडणूकीत सर्व उपस्थित संचालकांचे स्वागत व परिचय करून देण्यात आला व त्यांचे सर्व सभासदांनी उत्साहात स्वागत केले. यावेळी अध्यक्ष शेखर चरेगांवकर, उपाध्यक्ष अजित निकम, संचालक नानासाहेब पवार, प्रा.श्रीकृष्ण जोशी, गोपीनाथ कुलकर्णी, संदीप इंगळे, जयवंत जगदाळे, महेशकुमार जाधव, डॉ.प्रदीप शिंदे, डॉ.सचिन साळुंखे, सुहास हिरेमठ, परशराम जंगाणी, सौ.कल्पना गुणे, सी.ए.प्रियेश खिरड उपस्थित होते. विषय पत्रिकेवरील विषयांचे वाचन बँकेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी सौ.वैशाली मोकाशी यांनी केले व सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. बँकेचे उपाध्यक्ष अजित निकम यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

सभेस बहुसंख्य सभासद उपस्थित होते.

## लोकमंथन

### सभासदांच्या विश्वासामुळे दि यशवंत को-ऑप. बँकेची प्रगती : शेखर चरेगांवकर



कराड / प्रतिनिधी : दि यशवंत को-ऑप बँकेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा प. पू. उपळेकर महाराज समाधी मंदिर, फलटण या सभागृहात झाली. त्यावेळी बोलत असताना बँकेचे अध्यक्ष शेखर चरेगांवकर यांनी वरील उद्गार व्यक्त केले. सभेस बहुसंख्य सभासद उपस्थित होते.

कोरोना संपला असला तरी कोरोना कालावधीत उद्योग व्यवसायांचे झालेले नुकसान भरून काढण्याकरीता अजून २ ते ३ वर्षांचा कालावधी लागेल. व्यवसाय, शेती, उद्योग सुरु झाले असले तरी मागील ३ वर्षात जे नुकसान झाले आहे, ते भरून काढण्यासाठी बँकांनी कर्जदारांच्या मागे उभे राहून त्यांना सहकार्य केले पाहिजे. त्यासाठी बँकेने या आर्थिक वर्षाअखेर १६० कोटी ३५ लाख रुपयांचे कर्ज वाटप करून उद्योग, व्यवसाय, शेती यास उभारणी देण्याचे काम केले असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योग, व्यवसाय, शेती यासमोर असलेल्या समस्यांमुळे सध्या बँकांची नफा क्षमता कमी होत आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सभासदांनी डिव्हीडंडचा आग्रह न धरता बँकेच्या निधी सक्षमीकरणासाठी सहकार्य केले पाहिजे, असेही त्यांनी म्हटले.

सध्या आर्थिक क्षेत्र पूर्वपदावर येण्यासाठी काही विलंब लागत असला तरी दि यशवंत बँकेची झालेली वसुल भागभांडवलाची वाढ ५५ लाख ६२ हजार, ठेवीमध्ये झालेली वाढ ११ कोटी ५६ लाख, कर्जामध्ये झालेली वाढ १६ कोटी १२ लाख, नफ्यामध्ये झालेली वाढ ४५ लाख ६५ हजार अशी वाढ करत बँकेने ३५० कोटींचा एकत्रित व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला आहे. लेखापरीक्षणात सातत्याने १२ वर्षे मिळालेला मअ वर्गफ हे केवळ सभासदांनी बँकेच्या व्यवस्थापनावर दाखविलेल्या विश्वासामुळे शक्य झाले आहे, असे त्यांनी सांगितले.

बँकेच्या नुकत्याच पार पडलेल्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक बिनविरोध निवडणूकीत सर्व उपस्थित संचालकांचे स्वागत व परिचय करून देण्यात आला व त्यांचे सर्व सभासदांनी उत्साहात स्वागत केले. यावेळी अध्यक्ष शेखर चरेगांवकर, उपाध्यक्ष अजित निकम, संचालक नानासाहेब पवार, प्रा. श्रीकृष्ण जोशी, गोपीनाथ कुलकर्णी, संदीप इंगळे, जयवंत जगदाळे, महेशकुमार जाधव, डॉ. प्रदीप शिंदे, डॉ. सचिन साळुंखे, सुहास हिरेमठ, परशराम जंगाणी, सौ. कल्पना गुणे, सी. ए. प्रियेश खिरड उपस्थित होते. विषय पत्रिकेवरील विषयांचे वाचन बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. वैशाली मोकाशी यांनी केले. सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. बँकेचे उपाध्यक्ष अजित निकम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

उपनियंत्रक वैधमापनशास्त्र विभागाकडून

## सभासदांच्या विश्वासामुळे दि यशवंत को-ऑप.बँकेची प्रगती

### अध्यक्ष शेखर चरेगावकर यांचे उद्गार



कराड : दि यशवंत को-ऑप.बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी शेखर चरेगावकर, अजित निकम व संचालक मंडळ

कराड, दि. १० (प्रतिनिधी) : दि यशवंत को-ऑप.बँकेची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा प.पु.उपळेकर महाराज समाधी मंदिर, फलटण या सभागृहात संपन्न झाली. त्यावेळी बोलत असताना बँकेचे अध्यक्ष मा.शेखर चरेगांवकर यांनी वरील उद्गार व्यक्त केले. सभेस बहुसंख्य सभासद उपस्थित होते.

कोरोना संपला असला तरी कोरोना कालावधीत उद्योग व्यवसायांचे झालेले नुकसान भरुन काढण्याकरीता अजून २ ते ३ वर्षाचा कालावधी लागेल. व्यवसाय, शेती, उद्योग सुरु झाले असले तरी मागील ३ वर्षात जे नुकसान झाले आहे, ते भरून काढण्यासाठी बँकांनी कर्जदारांच्या मागे उभे राहून त्यांना सहकार्य केले पाहिजे. त्यासाठी बँकेने या आर्थिक वर्षाअखेर १६० कोटी ३५ लाख रुपयांचे कर्ज वाटप करून उद्योग, व्यवसाय, शेती यास उभारणी देण्याचे काम केले असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्योग, व्यवसाय, शेती यासमोर असलेल्या समस्यांमुळे सध्या बँकांची नफा क्षमता कमी होत आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सभासदांनी डिव्हीडंडचा आग्रह न धरता बँकेच्या निधी सक्षमीकरणासाठी सहकार्य केले पाहिजे असेही त्यांनी म्हंटले.

सध्या आर्थिक क्षेत्र पूर्वपदावर येण्यासाठी काही विलंब लागत असला तरी दि यशवंत बँकेची झालेली वसुल भागभांडवलाची वाढ ५५ लाख ६२ हजार, ठेवीमध्ये झालेली वाढ ११ कोटी ५६ लाख, कर्जामध्ये झालेली वाढ १६ कोटी १२ लाख, नफ्यामध्ये झालेली वाढ ४५ लाख ६५ हजार अशी वाढ करत बँकेने ३५० कोटीचा एकत्रित व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला आहे. लेखापरीक्षणात सातत्याने १२ वर्षे मिळालेला मअ वर्गफ हे केवळ सभासदांनी बँकेच्या व्यवस्थापनावर दाखविलेल्या विश्वासामुळे शक्य झाले आहे असे त्यांनी सांगितले.

बँकेच्या नुकत्याच पार पडलेल्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक बिनविरोध निवडणूकीत सर्व उपस्थित संचालकांचे स्वागत व परिचय करून देण्यात आला व त्यांचे सर्व सभासदांनी उत्साहात स्वागत केले. यावेळी अध्यक्ष शेखर चरेगांवकर, उपाध्यक्ष अजित निकम, संचालक नानासाहेब पवार, प्रा.श्रीकृष्ण जोशी, गोपीनाथ कुलकर्णी, संदीप इंगळे, जयवंत जगदाळे, महेशकुमार जाधव, डॉ.प्रदीप शिंदे, डॉ.सचिन साळुंखे, सुहास हिरेमठ, परशराम जंगाणी, सौ. कल्पना गुणे, सी.ए.प्रियेश खिरड उपस्थित होते. विषय पत्रिकेवरील विषयांचे वाचन बँकेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी सौ.वैशाली मोकाशी यांनी केले व सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. बँकेचे उपाध्यक्ष श्री.अजित निकम यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

## फलटण जनसेवा

संपादक : अरविंद मेहता

RNI No. : MAHMAR/2014/59024

Postal Reg.No. STR/077/2016-2018

फलटण • वर्ष ८ वे • अंक २३ वा • दिनांक : १२/०९/२०२२ • वार - सोमवार • किंमत रुपये - २/- • पाने ४

### यशवंत बँक सहकार क्षेत्रातील अग्रगण्य बँक ठरणार : शेखर चरेगावकर



# केंद्राच्या सहकार खात्याची नवी रचना सहकार क्षेत्रासाठी नवसंजीवनीच

–मा.शेखर चरेगांवकर, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार परिषद.

दैनिक लोकमत 'संडे मुलाखत'
प्रमोद सुकरे – लोकमत न्यूज नेटवर्क

केंद्र सरकारने सहकार खात्याची नवीन रचना नुकतीच केली आहे. त्यावरून हे धोरण सहकाराला पोषक नाही, यामुळे सहकार क्षेत्र मोडीत निघेल, अशी टीका काही जण करीत आहेत. याबाबत राज्याच्या सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष व सहकार तज्ज्ञ मा.शेखर चरेगांवकर यांचेशी केलेली ही बातचीत.

प्रश्न : केंद्र सरकारने कृषी मंत्रालयाला जोडलेले सहकार खाते वेगळे करण्याचा निर्णय घेतला आहे. तो कशासाठी?
उत्तर: केंद्रीय मंत्रिमंडळात सहकार खात्याची झालेली नवीन रचना ही सहकार चळवळीला नवसंजीवनी ठरणारी आहे. कृषी मंत्रालयाला जोडलेले सहकार खाते वेगळे करीत स्वतंत्र मंत्रालय तयार केले आहे. परिणामी याला स्वतंत्र बजेट मिळेल. नवीन संशोधन वाढेल. देशाच्या आयात–निर्यात धोरणावर परिणाम करणारी ताकद यातून निर्माण होईल.

प्रश्न : सहकारी संस्था राजकारणाचे अड्डे बनले आहेत. याबाबत काय सांगाल?
उत्तर : महाराष्ट्रात देशाच्या एकूण सहकारी संस्थांच्या तुलनेत सहकारी संस्थांचे प्रमाण ४० टक्के आहे; पण या सहकाराचा अभ्यास करताना प्रारंभ, मध्यंतर आणि चालू काळ, अशा तीन टप्प्यांत करावा लागेल. सुरुवातीला सेवाभाव उद्देश ठेवून हे काम झाले. मध्यंतरीच्या काळात मात्र राजकारणाचे जोडे या सहकारी संस्थांत आले. सध्या तर या सहकारी संस्थांच्या माध्यमातून समाजाला जे बदल अपेक्षित आहेत ते बदल त्या प्रमाणात स्वीकारल्याचे दिसत नाही. म्हणून त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होत आहे.

प्रश्न: सहकारी संस्थांचा फायदा शेतकऱ्यांऐवजी इतरांनाच जास्त झाला असे वाटते का ?
उत्तर: हो. काहींनी त्याचा फायदा करून घेतला; पण आता नव्या बदलांमुळे केंद्र सरकार नाबार्डच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांना पतपुरवठा करू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्ज मिळू शकते. सोसायटी, जिल्हा बँक, राज्य बँक इथे जाणारे त्याचे व्याज आता वाचणार आहे.

प्रश्न : आरबीआयच्या कडक नियमांमुळे अनेक बँकांसमोर पेच निर्माण होत आहे. याकडे तुम्ही कसे पाहता ?
उत्तर: कोणताही कायदा हा अडचणीचा कधीच नसतो, तर ती वापरण्याची क्षमता आपण वाढवली पाहिजे. ती क्षमता वाढली नाही तर सहकारी संस्थांना त्याची अडचण वाटू शकते.

संस्थांना भागभांडवल देण्याची पद्धत ही सवंग लोकप्रियतेसाठी, कार्यकर्त्यांना बळ देण्याच्या हेतूने सुरु करण्यात आली. सहकारी संस्था नोंदविण्यात आल्या, मात्र संस्थेची संख्या, लागणारा वेळ याचे कोठेही समीकरण न जुळल्याने शासनाची, संस्थेची, कार्यकर्त्यांची बदनामी तर झालीच; पण नियोजनशून्य कारभारामुळे अशा अनेक संस्था आजही फक्त कागदावरच दिसतात. ही बाब दुर्दैवी आहे.



क्षणचित्रे

# सातारा शाखेचा १० वा वर्धापनदिन

आपल्या यशवंत बँकेच्या सातारा शाखेचा १० वा वर्धापनदिन रविवार, १६ ऑक्टोबर २०२२ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. बँकेचे स्थानिक संचालक डॉ.श्री.सचिन साळुंखे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मोहिनी साळुंखे यांच्या हस्ते श्री सत्यनारायण पूजा संपन्न झाली. यादिवशी डॉ.मनोहर डोळे मेडिकल फौंडेशन, नारायणगांव, पुणे यांच्या सहकार्याने नेत्र तपासणी व मोतोबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सातारा येथील सभासद, ग्राहक, हितचिंतक व नागरिकांनी मोठ्या संख्येने शाखेस सदिच्छा भेट देवून या शिबिराचा लाभ घेतला.

★★★




















# बँकेच्या नविन ठेव योजना



TRUST 666

अविरत सेवेची व जपलेल्या विश्वासाची ४७ वर्षे

कराड शाखेच्या
वर्धापनदिनानिमित्त
सर्व ग्राहकांसाठी सर्वोच्च व्याजदराची
खास ठेव योजना...!

**8.75%**

- ✓ मुदत ३ वर्षे ते ५ वर्षे
- ✓ गुंतवणूक मर्यादा रक्कम ₹.१ लाख ते ५ लाख
- ✓ मासिक व्याज मिळण्याची सुविधा
- ✓ सामान्य ग्राहक, सभासद व ज्येष्ठ नागरिकांना समान व्याजदर

प्रत्येक ठेवीदारास ₹.५ लाखांचे ठेव विमा संरक्षण

## दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेला अथवा ग्राहक सेवा केंद्राला भेट द्या...

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | प्रतापगंज पेठ, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

## आता ७७ महिन्यातच होणार लक्षाधीश

अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर आपल्या यशवंत बँकेची
नवीन रिकरींग डिपॉझीट योजना



**'अक्षय्यवृध्दी'**

आवर्त ठेव योजना

दरमहा भरा ₹.१००० → ७७ महिन्यांनी → मिळवा ₹.१ लाख

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेस भेट द्या.

## दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | प्रतापगंज पेठ, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

# बँकेच्या नविन कर्ज योजना

## ए.सी., टी.व्ही, फ्रिज, सोलर, वॉशिंग मशीन, इन्व्हर्टर, कॉम्प्युटर, लॅपटॉप, कुलर, मोबाईल, आटाचक्की इत्यादी सर्व घरगुती वस्तु खरेदीसाठी कर्ज योजना सुरू...



नियम व अटी लागू *

कर्जासाठी येणारा मासीक हप्ता

**प्रति हजारी भरा**

१२ महिन्याकरीता रू. ९२/-

२४ महिन्याकरीता रू. ५०/-

३६ महिन्याकरीता रू. ३०/-

* आवश्यक कागदपत्रे *

आधार कार्ड, पॅन कार्ड, दोन फोटो, लाईटबील

- सोपी व सुलभ कर्जप्रस्ताव पध्दती
- त्वरीत कर्ज उपलब्धी

**दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण**

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेला अथवा ग्राहक सेवा केंद्राला भेट द्या...

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com  admin@yashwantbank.com

## सोने तारण कर्ज योजना

सुलभ व जलद कर्ज प्रक्रिया

प्रति तोळा ₹.४०,०००/-

व्याजदर फक्त १% (मासिक)



## खास सोने खरेदीसाठी कर्ज योजना

**Golden Opportunity Loan Scheme**

मासिक व्याजदर फक्त १%

स्वप्नवत सोने खरेदी आता सत्यात उतरणार..!



योजनांचा लाभ घेण्यासाठी आजच नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा...

**दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण**

फलटण - कराड - सातारा

## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

### बँकेची वैशिष्टे

- बँक असल्याने प्रत्येक ठेवीदारास रू. ५ लाखांचे ठेव विमा संरक्षण...
- सर्वात कमी सुट्या असणारी सहकारी बँक...
- सर्व शाखांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कॅश सुविधा देणारी बँक
- कोरोना विषाणू काळातही कॅश देण्यावर कोणतीही मर्यादा नाही...
- बचत गटांना केवळ अर्थसहाय्य नव्हे तर प्रशिक्षण देणारी बँक...
- राष्ट्रीय महिला कोषकडून निधी घेणारी राज्यातील पहिली बँक...
- रिकरिंग ठेव (R.D) खात्यावर मिळणाऱ्या रकमेइतके अपघाती विमा संरक्षण देणारी एकमेव बँक...
- मधुमित्र ठेव योजनेत डायबेटिक ग्राहकांना दरमहा मोफत तपासणी...
- ग्रीन फ्युचर ठेव योजनेत ७५० वृक्षांची लागवड व यशस्वी संगोपन...
- यशवंत महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम सलग १० वर्षे संपन्न...
- बँकेचे तज्ञ व निस्वार्थी संचालक मंडळ...
- व्यवस्थापन खर्च अत्यंत अल्प प्रमाणात ठेवणारी बँक...
- सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम...
- प्रत्येक नैसर्गिक आपत्तीत अग्रेसर होवून मदत कार्य करणारी बँक...

**✻ ग्राहक सेवा हा आमचा विभाग नसून स्वभावच आहे. ✻**

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेस भेट द्या.

### दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

### दि. ०१/१२/२०२१ पासूनचे ठेवीवरील सुधारीत व्याजदर

| अ.नं. | ठेव प्रकार | मुदत | सुधारित व्याजदर |
|---|---|---|---|
| १ | सेव्हिंग्ज ठेव | | ३.५० % |
| २ | स्पेशल सेव्हिंग्ज् ठेव | | ६.५० % |
| ३ | चिरंजिव सेव्हिंग्ज् ठेव | | ३.५० % |
| ४ | पिग्मी ठेव | | ३.०० % |
| ५ | सुपर फ्लेक्सी ठेव | | ५.०० % |
| ६ | अल्प मुदत | किमान १६ दिवस ते ९० दिवस | ५.५० % |
| ७ | अल्प मुदत | ९१ दिवस ते १८० दिवस | ५.७५ % |
| ८ | अल्प मुदत | १८१ दिवस ते ३६४ दिवस | ६.०० % |
| ९ | मध्यम मुदत | १ वर्ष | ७.२५ % |
| १० | मध्यम मुदत | १३ महिने ते २४ महिने | ७.७५ % |
| ११ | मध्यम मुदत | २५ महिने ते ६० महिने | ८.०० % |
| १२ | मासीक व्याज योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १३ | मधुमित्र योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १४ | आधार (जेष्ठ नागरीक) | ३ ते ५ वर्षे | ८.२५ % |
| १५ | दामदुप्पट ठेव | | ८ वर्षे |
| १६ | दामदिडपट ठेव योजना | | ४ वर्षे २ महिने |

रिकरिंग ठेव प्रकारामध्ये व्याजदर पूर्वीप्रमाणेच राहतील.

'अ' वर्ग सभासद किंवा जेष्ठ नागरीक यांना १ वर्ष व त्यापुढील कालावधीकरीताच्या ठेवींना ०.२५ टक्के जादा व्याजदर

आपली बँक, यशवंत बँक.

## दि यशवंत को-ऑप बँक लि; फलटण

फलटण-कराड-सातारा

बँकेच्या नव्या सभासदांसाठी खास आरोग्यदायी ठेव योजना

### ✻ सभासद आरोग्यवर्धिनी योजना ✻

सुरक्षितता... ठेवींबरोबर आरोग्याचीही..

| सभासद आरोग्यवर्धिनी - फेज १ | एकरकमी दरवर्षी रू. १०००/- चे शेअर्स |
|---|---|
| लॅबोरेटरी चार्जेस :- | |
| १) रक्त तपासणी (वर्षात कमाल मर्यादा रू. २००/-) | रू. १००/- |
| २) लघवी तपासणी (वर्षात कमाल मर्यादा रू.२००/-) | रू. १००/- |
| एक्स रे (वर्षातून एकदाच) | रू. १५०/- |
| कार्डीओग्राम (वर्षातून एकदाच) | रू. २००/- |
| डोळे तपासणी (वर्षातून एकदाच) | रू. १५०/- |
| डोळ्यांचे ऑपरेशन | रू. ५००/- |
| चष्मा खरेदी (एकदाच) | रू. २००/- |
| सोनोग्राफी (वर्षातून एकदाच) | रू. ३५०/- |
| सी.टी.स्कॅन (वर्षातून एकदाच) | रू. ५००/- |
| अंत्यविधी अनुदान | रू. १०००/- |

## कर्जावरील व्याज दर

| अ. नं. | कर्ज प्रकार | दि. ०१/०१/२०१७ पासून बदलेले सुधारित व्याजदर |
|---|---|---|
| १ | सामान्य कर्ज (जामीनकी तारण) | १६.००% |
| २ | स्थावर तारण कर्ज | १६.००% |
| ३ | हायपोथिकेशन कर्ज (जुने वाहन/मशिनरी) | १६.००% |
| ४ | हायपो. कॅश क्रेडीट कर्ज | १६.००% |
| ५ | यशवंत महिला स्वयंरोजगार कर्ज | १५.५०% |
| ६ | सोनेतारण | मुल्यांकनाच्या ५०% - १२%<br>मुल्यांकनाच्या ७५% - १४%<br>मुल्यांकनाच्या १००% - १६% |
| ७ | वाहनतारण कर्ज - मुदत ७ वर्षापर्यंत<br>वैयक्तिक वापराच्या वाहनाकरीता<br>व्यावसायिक वाहनाकरीता | <br>१२.००%<br>१३.००% |
| ८ | गृहबांधणी कर्ज<br>मुदत १५ वर्षापर्यंत | १२.००% |
| ९ | लघुउद्योग(SME) कर्ज रू. १० लाखांपर्यंत कॅश क्रेडिट व टर्म लोन मुदत १ ते ७ वर्षापर्यंत | १२.००% |
| १० | शैक्षणिक कर्ज | १२.००% |
| ११ | सी. आर. ई. कर्ज | १८.००% |

# घर तुमचं हक्काचं... तुमचं स्वतःचं...

# गृहप्रवेश

## गृहबांधणी/खरेदी कर्ज योजना

नवीन फ्लॅट खरेदीसाठी/घर बांधणीसाठी/जुना फ्लॅट/घर खरेदीसाठी
तुमच्या सध्याच्या घराच्या दुरूस्तीसाठी/विस्तारासाठी
एन. ए. प्लॉट खरेदी व बांधकाम दोन्हीसाठी

प्रति लाखास ₹ १२००/-

मुदत १५ वर्षे

कमाल मर्यादा ₹. ५० लाख

**पात्रता :**
व्यावसायिक – वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट
पगारदार – निव्वळ मासिक पगाराच्या ६० पट
शेती – वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट

**उत्पन्न कागदपत्रे :**
व्यावसायिक – गत ३ वर्षाची आयकर विवरण पत्रके
पगारदार – पगारपत्रक, हमीपत्र
शेती – शेती उत्पन्नाची कागदपत्रे, बँक स्टेटमेंट

**आवश्यक कागदपत्रे :**
मिळकतीशी संबंधित अद्ययावत कागदपत्रे,
७/१२ उतारा, सिटी सर्वे उतारा,
मूल्यांकन अहवाल

**कायदेशी बाबी :**
शोध अहवाल, कायदेशीर मत
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जामीनदार
आर्थिक कागदपत्रांसहीत.



प्रति लाखास ₹ २२२५/-

## गाडी कोणतीही घ्या... अर्थसहाय्य आम्ही करू...!

दुचाकी / चारचाकी वाहन खरेदीसाठी

# सुहाना सफर कर्ज योजना

२४ तासात कर्ज उपलब्ध

100 % पर्यंत कर्ज उपलब्ध



**आवश्यक कागदपत्रे :**
गाडीचे कोटेशन, मुल्यांकन रिपोर्ट

**आर्थिक कागदपत्रे :**
व्यावसायिक – गत ३ वर्षाची आयकर पत्रके
पगारदार – पगारपत्रक हमीपत्र
शेती – शेती उत्पन्नाची कागदपत्रे
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जामीनदार.